# माझ्या सुखाच्या कल्पना

लेखक - प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

मानवी सुख हा एक मोठा गहन विषय आहे. पिंडे पिंडे मतिर्भिन्ना या उक्तीप्रमाणे सुखाच्या कल्पना व्यक्तिगणिक वेगवेगळ्या असू शकतात. 'All men are alike, and yet, no two men are alike' हा जीवनातील एक मोठा विरोधाभास आहे. सुख कशाला मानावे हाही एक चर्चेचा विषय होईल. पण या जंजाळात शिरण्याऐवजी मी एक ज्येष्ठ नागरिक आहे. खूप पावसाळे अनुभवलेला माणूस आहे आणि एक स्वतंत्र मत असलेला मानव आहे. या दृष्टिकोनातून मी माझे विचार मांडावेत हे उत्तम. या वयात सुखाचे दोन पोटभेद संभवतात - एक ऐहिक व दुसरा आध्यात्मिक. ऐहिकमध्ये माझे आरोग्य, माझे आर्थिक स्वातंत्र्य, माझ्या शारीरिक आवडीनिवडी, माझ्या कुटुंबियांशी माझे संबंध या गोष्टींचा समावेश असेल. तर आध्यात्मिकमध्ये माझी देवावरील श्रद्धा, त्या अनुषंगाने माझ्या आवडीच्या गोष्टी व त्यापासून मला मिळणारा आनंद या गोष्टी असतील.

माझ्या मते चर्चेपुरते हे भेद मानले तरी ती दोन्ही सुखे एकमेकांपासून वेगळी नाहीत. आरोग्य चांगले नसेल तर अध्यात्मात लक्ष लागणार नाही आणि आध्यात्मिक बैठक नसेल तर शारीरिक सुखात कुठे थांबावे हे मला कळणार नाही, त्यामुळे मी मानसिक सुखाला, खऱ्या आनंदाला आंचवेन. मला एकटेपणा आवडत नाही. Man is not an island यावर माझा ठाम विश्वास आहे. माझ्यावर नितांत प्रेम करणारी माझी पत्नी कायम माझ्या समवेत असावी अशी माझी इच्छा आहे. परमेश्वराने आम्हा दोघांना एकदमच त्याच्याकडे घेऊन जावे अशी माझ्याकडून त्याला सतत प्रार्थना असते. वृद्धापकाळी जोडीदाराची अधिक गरज असते त्यामुळे प्रेमळ पत्नीचा सतत सहवास ही माझी सुखाची पहिली गरज आहे.

या वयामध्ये आपली मुले जवळ असावीत. त्यांच्या कामापरत्वे ती दूर जातील हे मला मानवते. पण त्यांचा सहवास मला गरजेवेळी सहज उपलब्ध असावा. बंगलोरमध्ये नोकरी करणारा मुलगा व्यवसायानिमित्त अमेरिकेत गेला त्यावेळी आम्हा दोघांना खूप वाईट वाटलं; असं वाटलं हा किती दूर गेला! पण त्यानंच आमची समजूत काढली: "मी बंगलोरला होतो त्यावेळी तुम्हाला भेटण्यासाठी मला २०-२२ तासांचा बसचा किंवा रेल्वेचा प्रवास करावा लागायचा. आताही तेवढ्याच वेळात विमानाने मी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. आणि आपण रोज फोनवर बोलू. माझ्या वाढलेल्या कमाईमुळे हे मला सहज शक्य आहे. तुमची आवडती नातवंडेही तुम्हाला दर सुटीत भेटू शकतील आणि email वर वारंवार पत्रे पाठवतील." आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीने ही सुखाची कल्पना सहज सुलभ झाली आहे.

आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहावे ही माझी सुखाची महत्त्वाची कल्पना आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, आणि प्रोस्टेट ग्रंथीच्या विकाराने ग्रासलेला ज्येष्ठ नागरिक आहे, पण नियमित व्यायाम, संयमित आहार, व तज्ञ डॉक्टरांच्या औषधयोजनेमुळे मी या सर्व व्याधींना काबूत ठेवले आहे. या रोगांना असेच आवाक्यात ठेवून निरामय आरोग्य उपभोगत मृत्यूला सामोरे जावे ही

माझी ऐहिक जीवनातील सुखाची महत्त्वाची कल्पना आहे. आणि मृत्यू सुद्धा कसा यावा? परवाच माझे एक नव्वद वर्षांचे मित्र स्नान, पूजा, न्याहारी आटोपून पेपर वाचत खुर्चीत बसले होते. वाचता वाचता त्यांची मान कलंडली आणि त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. सुखी जीवनाचा असा सुखी शेवट व्हावा ही माझ्या जीवनाच्या अखेरच्या सुखाची कल्पना आहे.

मला प्रवास करायला, प्रेक्षणीय स्थळे पाहायला खूप आवडते. 'बहु रत्ना वसुंधरे' च्या जास्तीत जास्त स्थळाना भेट देण्यात मला खूप आनंद वाटतो. मला पॅसिफिक महासागर प्रथम भेटला त्या वेळी सबंध दिवसभर त्याची विविध रूपे पाहात मी किनाऱ्यावर भटकलो होतो. Jung Frau च्या Top of Europe या शिखरावर बर्फाचा धिंगाणा व वाऱ्याचा स्वैर संचार अनुभवताना मी बेभान झालो होतो. अमेरिकेतील Crater Lake ची खोल निळाई पाहाताना श्रीकृष्णाच्या तेजस्वी निळ्याशार रुपाचा आविष्कार जाणवला होता. माझ्यात एक सिंदबाद दडलेला आहे. पॅसिफिक महासागरात बोटीतून Watching Whales चा अनुभव घेताना मला मळमळण्यामुळे व ओकाऱ्यामुळे Watching Hell असं वाटलं होतं. तरी माझं समुद्राचं वेड अजून तसंच आहे. अमेझॉन नदीचे विस्तृत पात्र व तिच्या काठावरील प्रचंड जंगल, आसाममधील ब्रह्मपुत्रा व तिच्या काठावरील काझीरंगा अरण्य, आफ्रिकेतील सफारी पार्क अशा काही गोष्टी मला अजून पहावयाच्या आहेत. मी व माझी पत्नी आम्ही दोघे निसर्गसौंदर्याचे वेडे आहोत. ही सर्व सौंदर्यस्थळे तिच्या समवेत मला याची देहा याची डोळा पाहायला मिळावीत ही माझी सुखाची एक कल्पना आहे. आणि त्यासाठी मला चांगले आरोग्य आणि आवश्यक तेवढी आर्थिक संपदा लाभावी ही माझी इच्छा आहे.

मला वाचण्याचे खूप वेड आहे. विद्यार्थीदशेत मी रात्री ३ वाजेपर्यंत जागून आवडती पुस्तके संपवली आहेत. चांगली पुस्तके हे मानवाचे सच्चे मित्र आहेत ही माझी अनुभवसिद्ध धारणा आहे. माझ्या आयुष्यातील कित्येक सुखाचे तास पुस्तकांच्या संगतीत गेले आहेत. ही माझी पुस्तकवाचनाची आवड व त्यासाठी अविरत चांगल्या पुस्तकांचा पुरवठा ही माझी खास वैयक्तिक सुखाची कल्पना आहे.

या ऐहिक सुखांच्या कल्पनांतून बाहेर पडून आध्यात्मिक सुखांच्या कल्पनांकडे मी वळलो की मला जाणवते की माझ्या ऐहिक सुखाच्या कल्पनांत माझे आध्यात्मिक सुख प्रेरणारूप झाले आहे. माझ्या प्रवासाच्या सुखातून सुद्धा मला एक आध्यात्मिक आनंद मिळाला. पॅसिफिक महासागर पाहताना मला Eye नावाची इंग्लिश कविता आठवली. त्यात तो कवी पॅसिफिकला पृथ्वीचा सतत उघडा असलेला डोळा म्हणतो, आणि (What it watches is the Divine Presence above) वर्डस्वर्थला ज्याप्रमाणे निसर्गामध्ये परमेश्वराचे अधिष्ठान जाणवते तसे थोडेसे माझे निसर्गाचे आकर्षण 'दिव्यत्वाची जेथ प्रतीती तेथे कर माझे जुळती' या प्रकारात मोडेल. विवेकानंद स्मारकाच्या एका शीलेवर बसून तीन सागरांचा संगम अनुभवण्यात नकळत मी दिव्यत्वाच्या खूप जवळ गेलो होतो.

मी आस्तिक आहे. तरुण वयात नास्तिक असणारा व मंदिरांतील मूर्तींना क्वचित नमस्कार करणारा मी आज कमालीचा सश्रद्ध झालो आहे. कदाचित माझ्या वृद्धत्वाचा तो परिणाम असेल. पण धार्मिक छटा असलेली पुस्तके वाचण्यात, एकटा असताना मनातल्या मनात नामस्मरण करताना मला खूप बरं वाटतं. मी कर्मकांडी नाही, पण पत्नीबरोबर सर्व धार्मिक गोष्टींमध्ये सहभागी होताना मला खूप आनंद जाणवतो. माझ्या या आध्यात्मिक कलाला माझी धार्मिक पत्नी मुख्यतः कारणीभूत आहे. नास्तिकतेकडून आस्तिकतेकडे वळलेले माझे मन या बाबतीत तिचे आभारी आहे. ज्ञानेश्वरीतील ओवी 'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत' माझी सर्वात आवडती आहे. त्या ओवीवर विश्वास ठेवणारा दुसऱ्या जीवाची हत्या करणार नाही, द्वेष करणार नाही, अवहेलना करणार नाही ... केवढे सुंदर तत्त्वज्ञान एका ओवीत दडलेले आहे. या ओवीप्रमाणे जगण्याचा माझा प्रयत्न आहे. अजून जमत नाही पण जमावे ही माझी आध्यात्मिक सुखाची कल्पना आहे.

आजकाल आध्यात्मिक विषयावरील व्याख्याने, प्रवचने ऐकण्यात माझे मन रमू लागले आहे. गुरुदेव शंकर अभ्यंकरांची गीतेवरील, ज्ञानेश्वरीवरील व्याख्याने मला मंत्रमुग्ध करतात. फुलगांवच्या स्वामी स्वरूपानंदांची व स्वामिनी स्थितप्रज्ञानंद यांची प्रवचने ऐकण्यात मी तन्मय होतो. ही व्याख्याने, प्रवचने ऐकून घरी परत आल्यानंतर एक अनिर्वचनीय आनंद व शांतपणा मी अनुभवतो. मला वाटू लागलेला हा आनंद चिरकाल स्वरूपाचा ठरावा अशी माझी सुखाची कल्पना आहे.

आणि सर्वात शेवटी, माझा आनंद संगीतात लपला आहे. सुगम संगीत, भावगीते, भजने, वाद्यसंगीत यांच्या मैफली किंवा सीडीज अथवा कॅसेट्स ऐकण्यात मला एक विलक्षण आनंद मिळतो. माझी मुले उत्तम वाद्यसंगीतकार आहेत. आणि माझी नातवंडे छान गातात. त्यांच्या संगीतमैफलींच्या सीडीज वा कॅसेट्स ऐकत, 'रामकृष्ण हरी' चा मनोमन जप करीत डोळे मिटावेत ही माझी परमोच्च सुखाची परम कल्पना.